# मायेचा पदर

डॉ. विजया वाड

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मायेचा पदर**
डॉ. विजया वाड

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
डॉ. विजया वाड
६/६६, प्रिन्स्टन बिल्डिंग, मेन स्ट्रीट,
हिरानंदानी गार्डन्स्, पवई, मुंबई- ४०० ०७६
दूरध्वनी : २५७० ४७५९

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २२०/-

**अर्पण**

प्रिय मंगल संत आणि
चि. अमोल, तुमच्या निर्मळ
जीवनशैलीला आणि
अंतरी झुळझुळणाऱ्या
प्रेमाच्या झऱ्यांना ही
कलाकृती अर्पण.
(आई)

**– डॉ. विजया वाड**

## आभार

पुस्तकांच्या जगात मला ठामपणे उभी करणाऱ्या दिलीप वामन काळे या सच्चरित्र प्रकाशक मित्राने मला अनगणित वाचकांशी जोडले. त्यांच्याबद्दल प्रेमभाव व्यक्त करते. अतुल जोशी, सचिन पोकळे, अभिजीत वैद्य हे आता पुस्तकपर्वातले माझे कुटुंबीय झाले आहेत, त्यांच्याबद्दल स्नेहभाव वाटतो मला. आभार मित्रांनो. अनेक दिवाळी अंकांनी माझा हात सातत्याने लिहिता ठेविला आहे त्या सर्वांच्या ऋणात राहणे आवडेल मला आणि माझे प्रियतम वाचक! तुम्ही माझी शक्ती, स्फूर्ती आणि चैतन्य आहात. तुमचे अखंड प्रेम आणि माझे जीवन दिसीमाशी वर्षानुवर्षे समृद्ध करीत आहे. त्या प्रेमाला माझा दंडवत.

आपलीच,

**– डॉ. विजया वाड**

# हृदयसंवाद

प्रिय वाचकहो,
सप्रेम नमस्कार!

आज 'मायेचा पदर' हा नवा कोरा एक दीर्घकथा आणि इतर कथा यांचा संग्रह आपल्या हाती देताना मला किती आनंद होतोय म्हणून सांगू? सरळ, साध्या... मनीच्या गोष्टी मी सातत्याने आपणासाठी लिहिते तेव्हा मनी एकच धारणा असते. माझा प्रिय वाचक माझे लिखाण वाचून आशेच्या दिशेने झुकला पाहिजे. काही अवघड प्रसंगांतून सावरला पाहिजे. स्त्रीला पुन्हा नव्याने जगावंसं वाटलं पाहिजे. तो, ती, त्यांचं घर, त्यांची चिमणी पाखरं यांच्यासाठी माझ्या कथांनी आनंदाची कवाडं उघडली पाहिजेत. तुमचे हसरे, सुखी जीवन ही माझ्यासाठी सर्वांत मोठी गोष्ट आहे. याहून अधिक मला काही काही नको. प्रिय वाचकांनो, 'मायेचा पदर' मांगल्य नि प्रेम जपतो. याच वत्सलतेचा स्पर्श आपल्या प्रत्येक दिवसाला लाभावा अशी मनोमन प्रार्थना करते मी वाचकांनो. आता मी फक्त प्रेम करण्यापुरतीच उरलीय असे मला वाटते. तेव्हा उरातली दुथडी भरून वाहणारी माया तुम्हा सर्वांसाठी भरभरून देतेय. आवडल्या कथा तर जरूर कळवा फोन करून.

आपलीच,
**– डॉ. विजया वाड**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. गुळाचे घारगे | .................... | ९ |
| २. फेविकॉल का जोड | .................... | ७९ |
| ३. या सुखांनो या | .................... | ८९ |
| ४. स्पर्श संवेदना : एक हृदयस्पर्शी सफर | .................... | १०८ |
| ५. दैव जाणिले कुणी? | .................... | ११५ |
| ६. बल्लव | .................... | १२५ |
| ७. आई | .................... | १३१ |
| ८. उपरती | .................... | १४३ |
| ९. सख्खे शेजारी | .................... | १५० |
| १०. सामर्थ्य | .................... | १५४ |
| ११. झेरॉक्स कॉपी | .................... | १५७ |
| १२. कामिनी | .................... | १६० |
| १३. मी शोधिले स्वत:ला | .................... | १६३ |
| १४. जाणीव | .................... | १६६ |
| १५. संत जन्मावा पण... | .................... | १६९ |
| १६. मारो गोली | .................... | १७३ |
| १७. सासर माझे असे देवघर | .................... | १७७ |
| १८. पार्टिंग पार्टी | .................... | १८० |


✦✦✦

# गुळाचे घारगे

''सुभगा ऽ ऽ माझा पेरूचा पापा?'' सुधाकर उंच आवाजात तिला हाकारता झाला तेव्हा राधाबाईंच्या काळजात कळ उठली. कालपरवापर्यंत याचं ध्रूपद आई होती, ''पेरूचा पापा त्या म्हणायच्या. पेन, रुमाल, चावी, पास, पाकीट!''

''आई, पेरूचा पापा दे. आई मी जातो. आई मला यायला उशीर होईल. तू जेवून घे. आई... आई... गळूनच गेलं सगळं तोंडातून. कसं? पाऱ्यासारखं? निसटलं? ''अरे मी साडी नेसतेय सुधा...''

''आ? थांब थांब... साडी माझ्या चॉईसची नेस. तो झर्रकन त्यांच्या बेडरूमकडे पळाला. राधा थोडी बाजूला उभी होती म्हणून बरं. नाहीतर पडलीच असती या झपाट्यात.

त्या बेडरूमकडे बघत राहिल्या. केशवराव चष्म्यातून बघत राहिले. ''नवीन आहे अजून राधा, समजून घे..''

''आमचं का लग्न नवं नव्हतं कधी? तुम्हाला होती अशी हौस? बायको साडी नेसली की पोतेरं? कश्शाकश्शाचं तुम्हाला कौतुक नव्हतं. कधीच नव्हतं. मोठा कैवार घेतायत सुनेचा.''

''अगं राधा...''

''बोलू नका माझ्याशी...'' ती तटकन् तोडत म्हणाली.

''आई, मी निघतो.'' सुधाकर गडबडीनं बाहेर येत म्हणाला. टीव्हीसमोरच्या टीपॉयपाशी गेला. 'पेरूचा पापा' उचलायला. ''सुभी, टीपॉयवर नाहीयेऽऽऽ'' तो परत आत जाऊ लागला. तसं आडवा हात घालून राधानं त्याला थांबवलं.

''काय आता?''

''माझ्या हातात आहे सगळं तुला हवंय ते.''

''तू का उचललंस?''

''मला चोरीय का?''

''वाटेल ते काय बोलतेस आई? मी असं काही बोललो का तरी? माझी घाई होते म्हणून म्हणालो.''

''बायकोला साडी काढून द्यायला आत पळालास तो वाघासारखा? सात मिनिटं आत होतास. तेव्हा नाही झाली घाई? लोकल चुकेल असं नाही वाटलं?''

''राधा... काय बोलतेयस?'' केशवराव मध्ये पडले.

''अरे वा, तुम्हाला देवानं तोंड दिलं ते काय फक्त बायकोचे वाभाडे काढायला?''

''अगं बाबा योग्य तेच बोलले आहेत. तू उगाच राग राग करतेस. त्रागा करतेस. नको ना सुंदर सकाळ बिघडवू प्लीज!'' त्यानं पेरूचा पापा आईच्या हातातून सोडवून घेतला.

''आई, सुभीची दृष्ट काढून टाक. इतकी सुंदर दिसतीय माझी बायको. कुणाची नजर नको लागायला.'' तो आपल्याच जगात होता.

''जातो.'' बाबांकडे वळून त्यानं म्हटलं नि पुन्हा एकदा उंच आवाजात बायकोला बाय केलं.

दरवाजा बंद झाला नि राधाचं तोंड सुटलं.

''दृष्ट काढा म्हणे! असं असतं तर करीना कपूर, दीपिका पदुकोण यांच्यामागे मीठ-मोहऱ्यांची पोतीच घेऊन उभ्या असत्या त्यांच्या सास्वा!''

''अगं शर्मिला टागोर तुझ्यासारखी रिकामटेकडीय का? नि दीपिका पदुकोण अजून बोहोल्यावर चढली कुठे? तिचं न 'बर्फीचं' फाटलं परत. त्या कटरीना कैफनं लावला लग्गा!''

''सिनेकोशकार केशवराव... मला रिकामटेकडी ठेवण्यात तुमचा सिंहाचा वाटाय. नि तुमच्या हत्तीचा वाटा! दुष्ट लोक! कमालीचे रोगट वृत्तीचे लोक!''

''तरी अठ्ठेचाळीस वर्ष राहिलीस या घरात. दुष्ट नि रोगट वृत्तीच्या माणसात.''

''मला माझी सकाळ खराब करायची नाहीये. चांगली बी.ए. होते मी सायकॉलॉजी घेऊन; पण उपयोग काय? फक्त आयुष्यभर बायकॉलॉजी केली.